ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-III May - June 2021

# विद्यार्थ्यांच्या रिकाम्या वेळेबाबत जाणीव व जागृती

डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी
*प्राचार्य,*
*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

## प्रास्ताविक –

कोरोना काळात संपूण्र जगभरात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. व्यवहार ठप्प झाले कोरोनाचा परिणाम सर्व क्षेत्रावर झाला त्यात शैक्षणिक क्षेत्र ही आलेच. शालेय परीक्षा रद्द झाल्या खडृ फळा वर्ग विद्यार्थी शाळा हे चक्र बंद होवून ऑनलाईन शिक्षणाची प्रक्रिया सुरु झाली विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येते की काय अशी जाणीव होवू लागली.

विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकार होण्यासाठी शिक्षक व पालक हया दोघांचीही भूमिका महत्त्वपूर्ण असते पालक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक मानसिक, शारिरीक, भावनिक विकास करु शकतात. लॉकडावून व ऑनलाईन शिक्षणाच्या काळात पालक पाल्यांना मोबाईल, लॅपटॉप, टॅब उपलब्ध करुन देत आहोत व त्याचा योग्य उपयोग पाल्य करतो की नाही हे पाहणेही पालकांचीच जबाबदारी होवून बसली आहे ही जबाबदारी पालकांकडून योग्य पध्दतीने पार पाडली जाते आहे हे पाहण्यासाठी हा विषय निश्चित केला आहे यासाठी श्रीमती भागीरथीबाई पवार माध्यमिक विद्यालयातील इ. 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांच्या पन्नास पालकांची निवड सप्रयोजन पध्दतीने करण्यात आली होती माहिती संकलनासाठी ऑनलाईन प्रश्नावली ( गुगल फॉर्म ) वापर करण्यात आला होता मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेवडेवारी व वृत्तालेख या साधनाचा वापर करण्यात आला होता.

*Aarhat Publication & Aarhat Journals*is licensed Based on a work at*http://www.aarhat.com/eiirj/*

## समस्या विधान –

लॉकडाऊन ( टाळेबंदीच्या ) काळात श्रीमती भागीरथीबाई पवार माध्यमिक विद्यालय, जाखोरी येथील इ. 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांच्या रिकाम्या वेळेच्या सदुपयोगाबाबत पालकांच्या जाणीव जागृतीचा अभ्यास

## पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या –

1. लॉकडाऊन ( टाळेबंदी ) – कोरोना विषाणूचा संसर्ग होऊ नये म्हणून भारत सरकारने व महाराष्ट्र सरकारने 20 मार्च 2020 पासुन 3 मे 2020 पर्यंत लागू केलेली टाळेबंदी.
2. रिकामा वेळ – टाळेबंदीच्या काळात सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना जो जास्तीचा वेळ उपलब्ध झालेला होता तो म्हणजे रिकामा वेळ होय.

3. विद्यार्थी – श्रीमती भागीरथीबाई पवार माध्यमिक विद्यालय, जाखोरी येथील इ. 8 वी ते 10 वी चे विद्यार्थी
4. पालक – श्रीमती भागीरथीबाई पवार माध्यमिक विद्यालय, जाखोरी येथील इ. 8 वी ते 10 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्त्री किंवा पुरुष पालक.
5. जाणीव जागृती – एखादे कार्य करता येण्याची क्षमता.

**उद्दिष्टे –**

1. पालक आपल्या पाल्यासाठी रिकाम्या वेळेतील आयोजित खेळांचा शोध घेणे.
2. पालक आपल्या पाल्यांसाठी वापरत असलेल्या मनोरंजनाच्या साधनांचा शोध घेणे.
3. पालक आपल्या पाल्यांसाठीच्या वाचनासाठी उपलब्ध करुन देत असलेल्या साहित्याचा शोध घेणे.
4. लॉकडाऊनच्या काळात शाळेतल्या उपक्रमांविषयी पालकांकडून माहिती घेणे.
5. ऑनलाईन अध्ययनासाठी पालकांनी पाल्यांसाठी उपलब्ध केलेल्या सुविधेविषयी माहिती जाणून घेणे.
6. पालक आपल्या पाल्यांना देत असलेल्या घरकामाच्या संधीविषयी माहिती जाणून घेणे.
7. पालकांना आपल्या पाल्याच्या समुपदेशनाच्या आवश्यकतेचा शोध घेणे.

**महत्व –**

प्रस्तुत संशोधनात टाळेबंदीच्या काळात विद्यार्थ्यांच्या रिकामा वेळेचा उपयोग व त्यात पालकांची भूमिका हे जाणून घेण्यासाठी करण्यात आले आहे यात पालकांचे महत्त्वपूर्ण योगदान व त्याचा विद्यार्थ्यांना कितपत उपयोग होतो हे पाहण्याठी गरजेचे आहे या दरम्यान विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी व रिकाम्या वेळेचे मार्गदर्शन पालकांना व विद्यार्थ्यांना करण्यासाठी हया संशोधनाचा उपयोग होणार आहे.

**मर्यादा –**

प्रस्तूत संशोधन हे श्रीमती भागीरथीबाई पवार माध्यमिक विद्यालय, जाखोरी येथील इ. 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांच्या पालकांपुरताच मर्यादित आहे.

**संशोधन कार्यपध्दती –**

प्रस्तुत संशांधनासाठी वर्णनात्मक पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला होता.

**नमुना निवड –**

प्रस्तुत संशांधनासाठी प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने पन्नास पालकांची निवड करण्यात आली होती.

**माहिती संकलनाची साधने –**

प्रस्तुत संशांधनासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या संशोधक निर्मिती साधनाचा वापर करण्यात आला होता. प्रश्नावली मध्ये एकूण 15 प्रश्न होते. सदर प्रश्नावली गुगल फॉर्म या ऑनलाईन माध्यमाद्वारे तयार करण्यात आली होती. प्रश्नावली मध्ये तयार करण्यात आलेले प्रश्न हे विद्यार्थ्यांच्या रिकाम्या वेळेच्या सदउपयोगाबाबत पालकांच्या जाणीव जागृतीबाबत होते.

**माहितीचे विश्लेषन –**

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी हया संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करण्यात आला होता.

प्रतिसादकापैकी पुरुष पालकांचे प्रमाण 63% इतके होते व स्त्री पालकांचे प्रमाण 36.6 % इतके होते. त्यास एस.एस.सी 9 %, एच.एस.सी 21 %, पदवी 25 %, पदव्युत्तर 45 %, होते

**निष्कर्ष –**

1. टाळेबंदीच्या काळात वेळेचा सदुपयोग करण्यासाठी सर्वाधिक पालक आपल्या पाल्यांना योगा व सूर्यनमस्कार करावयास सांगत होते.
2. मनोरंजनासाठी टि.व्ही चा वापर आपल्या पाल्यांसाठी केलेला दिसतो.
3. लॉकडाऊनच्या काळात गोष्टीची पुस्तके वाचणे हा पर्याय सर्वाधिक पालकांना सर्वात योग्य वाटत होता.
4. ऑनलाईन अध्ययनासाठी जास्तीत जास्त पालकांनी ॲन्ड्रॉइड फोन ची सुविधा प्राप्त करुन दिली होती. तर त्या खालोखाल लॅपटॉप व टॅबची सुविधा उपलब्ध करुन दिली होती.
5. पालक आपल्या पाल्यांना घरकामांमध्ये मदत करण्यासाठी संधी देत असल्याने दिसुन आले. घराची सफाई करण्याचे काम जास्तीत जास्त पालक आपल्या पाल्यांना लावत असत असे दिसुन आले.
6. सर्वच 100% पालकांना पाल्यांच्या समुपदेशनाची गरज भासते

**समारोप –**

प्रस्तुत संशांधनामध्ये सहभागी असणारे पालक हे ग्रामिण भागातील असूनही जागरुक आढळले पालकांनी विद्यार्थ्यांना ॲन्ड्रॉइड फोन उपलब्ध करुन दिले आहेत. पालक व विद्यार्थी परिस्थितीशी समायोजन साधत आहेत शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा तांत्रिकदृष्टया विद्यार्थी सक्षम झाले पाहिजे.

**संदर्भ –**

1. मुळे व उमाठे ( 1998 ) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे
2. भिंताडे, वि.रा. ( 1999 ) शैक्षणिक संशोधन